CNR-MHGA090008492022 SCC No.425/2022

**न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, चामोर्शी, जि.गडचिरोली यांचे न्यायालय**
(पिठासीन अधिकारी एन डी मेश्राम)

सं.मा.क्र.४२५/२०२२
निशानी क्र.०३

**-: गुन्हयाचे विवरण :-**

| | |
|---|---|
| १. अपराध घडल्याचा दिनांक | ०२.०५.२०२२ |
| २. अहवालाचा किंवा फिर्यादीचा दिनांक | ०२.०५.२०२२ |
| ३. फिर्यादीचे नाव व पत्ता | महाराष्ट् शासन तर्फे<br>पोलीस ठाणे, चामोर्शी. |
| ४. आरोपीचे नाव, वय व निवासस्थान | अशित अदिल बिश्वास,<br>वय ४० वर्षे, व्यवसाय - मजुरी,<br>रा.घोट, ता. चामोर्शी,<br>जि. गडचिरोली. |

५. अपराधाचा तपशिल

तुम्ही दिनांक ०२/०५/२०२२ रोजी दुपारी १.१० ते ०१.२५ वाजताचे सुमारास मौजा चामोर्शी येथे शारदा राईस मिल समोर जाणा-या रोडवर रस्त्याच्या मधोमध तुमचे ताब्यातील काळी पिवळी वाहन महिंद्रा मॅक्स नोंदणीकृत क्र. एमएच ३३-६१५ येणारे जाणारे लोकांना व वाहतुकीस अडथळा निर्माण होईल तसेच लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अशा स्थितीत उभे केलेले मिळुन आले व त्याद्वारे तुम्ही भारतीय दंड संहितेचे कलम २८३ अन्वये गुन्हा केला व मी त्याची दखल घेतली आहे.

६. आरोपीचे प्रतिकथन :

प्रश्न १ : तुम्हाला फिर्यादची नक्कल मिळाली आहे का ?
उत्तर : होय.

प्रश्न २ : तुम्हाला तुमच्यावरील आरोप मान्य आहेत का ?
उत्तर : होय.

आरोपीला त्याच्यावरील आरोप मराठी भाषेत समजावुन सांगण्यात आला व तो मान्य केला.

माझे समक्ष

......स्वा/-........
आरोपीची सही/अंगठा
दि.१९/१०/२०२२.

स्वा/-
(एन डी मेश्राम)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
चामोर्शी.

**आदेश**

आरोपीविरुध्द भारतिय दंड संहितेचे कलम २८३ अन्वये गुन्हा नोंद असुन आरोपीने स्वईच्छेने सदर गुन्हा कबुल असल्याची पुरसीस निशानी २ दाखल केली. आरोपीला गुन्हयाचे स्वरुप व दंड रकमेची माहिती दिली तरी देखील आरोपी गुन्हा स्वईच्छेने कबुल करण्यास तयार आहे. आरोपीला शिक्षेसंबंधी एकुन घेण्यात आले. आरोपीने सांगितले की, त्याच्या कुटूंबाचा उदरनिर्वाह त्याच्या कमाईवर अवलंबुन आहे तसेच त्याने यापुर्वी अशा प्रकारचा कोणताही गुन्हा केला नाही. त्यामुळे त्याला कमीत कमी दंडावर सोडण्यात यावे. गुन्हयाचे स्वरुप लक्षात घेता न्यायाच्या दृष्टीने खालीलप्रमाणे आदेश करण्यात आला.

**आदेश**

आरोपी अशित अदिल बिश्वास, रा. घोट, ता.चामोर्शी, जि.गडचिरोली याला फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम २५५(२) अन्वये भारतीय दंड संहितेचे कलम २८३ चे गुन्हयासाठी दोषी ठरवुन त्याला रु.२००/-(दोनशे रुपये फक्त) दंडाची शिक्षा ठोठावण्यात येते. दंड रक्कम जमा न केल्यास ०३(तीन) दिवस साध्या कारागृहबंदीची शिक्षा ठोठावण्यात येते.

स्वा/-
(एन डी मेश्राम)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
चामोर्शी.

ता.१९/१०/२०२२